आर.सी.सी. ८१/२०२३
**निशाणी २०**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव — शितल संदेश गुरव, वय — ३२ वर्षे,
व्यवसाय — काही नाही, राहणार — नवलेवाडी,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी विधिज्ञा श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. आरोपी हे माझे पती आहेत. माझे लग्न आरोपी सोबत दि. १५/०२/२०२१ रोजी झाले होते. माझे लग्न थाटामाटात झाले होते व माझे वडीलांनी लग्नात सर्व संसारउपयोगी साहित्य व सोन्याचे दागिने दिले होते. लग्नानंतर मी पनवेल येथे नांदण्याकरीता गेले. त्या ठिकाणी आमचे सोबत माझे सासु–सासरे, पती व भाया हे राहत होते.

२. लग्नानंतर ४ ते ५ दिवस आरोपीने मला चांगले नांदवले. त्यानंतर ते मला घालुनपाडून बोलत होते व अपमान करत होते. तसेच तुला स्वयंपाक येत नाही, काम येत नाही, तुझ्या वडीलांनी लग्नात मोठ्या वस्तू दिल्या नाहीत असे म्हणत होता व माझा छळ करून मारहाण करत होता. त्यानंतर दि. ०५/०३/२०२१ रोजी संध्याकाळी ०८.०० वाजण्याच्या सुमारास आरोपीने मला फ्लॅट घेण्याकरीता माहेरून १० लाख रूपये आणण्यास सांगितले. मी त्यांना माझ्या वडीलांची परिस्थीती नाही ते देवू शकत नाहीत असे सांगितले. तरी त्यांनी मला घराबाहेर काढून दिले.

३. त्यानंतर मी माहेरच्यांना सांगितले. माझे वडील मला सासरी घेवून आले. माझे वडीलांनी सांगितले की, माझी परिस्थिती नाही, मी देवू शकत नाही, तुम्ही मुलीला नांदवा. त्यांना माझा पुन्हा छळ सुरू केला. तु

पैसे नाही आणले तर तुला नांदवणार नाही असे सांगितले.

४. माझे पती दारू पिवून येवून त्यांनी मला मारहाण करून शिवीगाळ केली, ते मला रोज उपाशी ठेवत होते. त्यानंतर दि. १०/०३/२०२१ रोजी रात्री १० च्या सुमारास आरोपीने मला लाथाबुक्यांनी मारहाण करून उपाशी, एका वस्त्रानिशी घरातून काढून दिले व पैसे घेवून नाही आली तर नांदवणार नाही असे सांगितले. त्यानंतर मी माहेरी आहे. मी पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरीता गेले होते. त्यांनी भरोसा सेलमध्ये पाठवले. भरोसा सेलमध्ये गेल्यानंतर जेव्हा त्यांनी मला पत्र दिले तेव्हा त्यांनी माझी तक्रार दाखल करून घेतली.

५. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील छापील प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **निशाणी २२** देण्यात येते. फिर्यादी दिल्यानंतर पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. मी आरोपीस ओळखते तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी. जी. वैद्य यांच्या मार्फत</u> –**

६. माझे शिक्षण एमसीए पर्यंत झाले आहे. माझे पतीचे आर्किटेकचे शिक्षण झालेले आहे. माझे लग्न जमले त्यावेळी माझे पती नोकरीस होते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे लग्न कोविडच्या कालावधीत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोव्हेंबर २०२२ मध्ये मी भरोसा सेलमध्ये तक्रार केली होती.

आर.सी.सी. ८१/२०२३
**निशाणी २०**

**प्रश्न –** समुपोदशनाच्या वेळी तुमचे पती तुम्हाला नांदावयाला नेण्यास तयार होते ?

**उत्तर –** ते नांदावयाला नेण्यास तयार होते. मी जाण्यास तयार नव्हते कारण माझ्या जिवाला धोका होता.

७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जिवाला धोका होता हे मी खोटे सांगत आहे. माझे लग्नानंतर आम्ही माझे पतीचे मुळ गावी भूम येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. १८/०२/२०२१ रोजी तेथे पुजा झाली. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/०२/२०२१ रोजी मी माहेरील लोकांसोबत माहेरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २५/०२/२०२१ रोजी मी पनवेल येथे गेले.

**प्रश्न –** दिनांक १०/०३/२०२१ तुझे वडील तुला अकोले येथे घेवून आले?

**उत्तर –** त्याने काढून दिले होते.

हे म्हणणे खरे नाही की, मला काढून दिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८/०२/२०२१ पासून माझ्या पतीने नोकरीला जाण्यास सुरूवात केली.

**प्रश्न –** पनवेल येथे गेल्यानंतर तुमचे व तुमच्या पतीचे एकमेकांशी वागणे बोलणे चांगले होते ?

**उत्तर –** ३ ते ४ दिवस चांगले होते.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी माहेरी आल्यानंतर माझ्या पतीने मला नांदायला येण्याकरीता नोटीस पाठविली होती. साक्षीदार सांगते की,

एप्रिलमध्ये पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसला मी जूनमध्ये उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, नोटीस दिल्यानंतर माझे पती मला घेवून जाण्याकरीता जूनमध्ये आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने मला नोकरी करीता सॉफ्टवेअर डेव्हलपरचा क्लास देखील लावला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला नोकरी करायची आहे असे ठरले होते.

९. मी पनवेल येथे खांदा कॉलनी येथे राहत होते. तेथे आजुबाजूला इतर लोक राहत असतील की नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या ठिकाणी राहत होती ती रहिवासी बिल्डींग होती. माझा वाढदिवस २८ फेब्रुवारीला असतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझा वाढदिवस साजरा केला होता. वाढदिवसाला माझ्या पतीने केक कापला, ड्रेस घेतला.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी नांदत असताना माझे पती काहीतरी गोळ्या घेतात हे आढळून आले. हे म्हणणे खरे आहे की, त्या गोळ्या मानसिक आजाराच्या असाव्यात अशी मला शंका आली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी माझ्या पतीला त्याबाबत विचारणा केली.

**प्रश्न –** ज्यावेळेस तुम्ही त्यांना विचारले त्यावेळेस तुमच्या पतीने त्यांना तसा काही आजार नसल्याचे सांगितले ?
**उत्तर –** मी विचारले त्यावेळी माझ्या पतीने मला मारहाण केली.

हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीने मला मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीस मानसिक आजार

आहे असा संशय असल्याने त्यांचा व माझा संसार होणार नाही असे मला वाटते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने मला घटस्फोट द्यावा अशी माझी इच्छा आहे. माझी नांदायला जाण्याची तयार आहे परंतु माझ्या जिवाला धोका आहे.

**आरोपीच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष

ANANT RADHAKISHAN TENGSE Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE Date: 2025.10.01 17:21:06 +0530

दिनांक १९.०६.२०२५ **( अनंत रा. टेंगसे )**

अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

कोर्ट नं. २, अकोले

**<u>आज दिनांक ०१.१०.२०२५ रोजी साक्षीदार शितल संदेश गुरव यांचा उर्वरीत उलटतपास शपथेवर पुढे सुरू</u>**

११. माझ्या वडीलांचे शिक्षण एम.कॉम पर्यंत झालेले आहे व ते अगस्ती कारखान्यामध्ये मुख्य लेखापाल म्हणून कार्यरत होते. माझ्या वडीलांची शेती अकोले येथे अगस्ती मंदीराच्या जवळ आहे. सदरची शेती ही बागायती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे अकोले येथे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील एल.आय.सी एजेंट म्हणून काम करत होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न झाले त्यावेळी आरोपी हा नोकरीस होता व त्यास दरमहा पस्तीस हजार रुपये पगार होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासू–सास–यास दरमहा ३५ हजार रुपये प्रत्येकी पेन्शन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा दीर हा नोकरीस असून त्यास दरमहा ४० हजार रूपये पगार आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना शेतीपासून दरमहा ४ ते ५ लाख रूपयांचे उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला लग्नात चार तोळ्याचे दागिने केले होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की, दोन ते अडीच तोळ्याचे दागिने केले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची आर्थिक परिस्थिती चांगली आहे.

१३. आरोपी यांचे पनवेल येथील घरापासून एस.टी. स्टॅन्डचे अंतर किती आहे हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला एस.टी. स्टॅन्डला जाण्याची गरज पडली नाही म्हणून मला सदरचे अंतर माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या ज्या वेळी अकोलेला आले त्यावेळी माझे वडील चारचाकी गाडी घेवून येत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांसोबत संतोष चौधरी हा गाडी चालक असायचा. हे म्हणणे खरे आहे की, मी १० तारखेला ज्यावेळी आले त्यावेळी माझ्या सासूने माझे वडील व संतोष चौधरी यांच्याकरीता पोहे बनवले होते. हे म्हणणे खरे नाही की, अकोलेला यायचे म्हणून माझे वडील माझी बॅग भरत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी चर्चा झाली की ४ ते ५ दिवसांनी मला पनवेल येथे परत पाठवतो.

१४. दिनांक १०.०३.२०२१ रोजी मी येत असताना पनवेल पोलीस स्टेशनला लेखी तक्रार केली नाही.

प्रश्न – मार्च २०२१ मध्ये अकोले पोलीस स्टेशनला लेखी तक्रार केली काय?

उत्तर – मी तक्रार दिली होती होती. परंतु, ती त्यांनी घेतली नाही.
हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला तशी तक्रार केली होती हे मी खोटे सांगत आहे. मार्च २०२१ मध्ये मी पोलीस स्टेशनला पोस्टाने तक्रार पाठवली नाही. आरोपींनी दिलेल्या नोटीसला उत्तर देण्यापुर्वीही मी पोलीस स्टेशनला लेखी तक्रार पाठवली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींविरूध्द ४९८ ची केस करायची असे माझे व वडीलांचे ठरले. अकोले पोलीस स्टेशनला दिलेली फिर्याद मी वाचून पाहिली होती.

१५. मी पोलीसांना फिर्याद देतवेळी, दिनांक १०.०३.२०२१ रोजी मला घरातून काढून दिले ही बाब सांगितली होती. परंतु, सदरची बाब ही पोलीसांकडील प्रिंट मिस्टेकमुळे माझ्या फिर्यादीमध्ये नमूद झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली फिर्याद ही माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेली नाही. माझे फिर्यादीतील, दिनांक ०८.०३.२०२१ आरोपींनी मला मारहाण केली हा मजकूर चुकीचा आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की, तारीख चुकीची आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे मला कोणतीही मारहाण झालेली नाही तसेच कोणता त्रासही झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०३.२०२१ रोजी दुपारी माझे वडील मला नेण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०३.२०२१ रोजी आरोपींनी फ्लॅट घेण्याकरीता १० लाख रूपये घेवून ये असे म्हणून मला मारहाण करून घराबाहेर काढून दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, 'माझे वडील मला सासरी घेवून आले. माझे वडीलांनी सांगितले की, माझी परिस्थिती नाही, मी देवू शकत नाही, तुम्ही मुलीला नांदवा. त्यांना माझा पुन्हा छळ सुरू केला. तु पैसे नाही आणले तर तुला नांदवणार नाही असे सांगितले' हे मी खोटे सांगत आहे.

आर.सी.सी. ८१/२०२३
**निशाणी २०**

१७. हे म्हणणे खरे नाही की, 'माझे पती दारू पिवून येवून त्यांनी मला मारहाण करून शिवीगाळ केली, ते मला रोज उपाशी ठेवत होते. त्यानंतर दि. १०/०३/२०२१ रोजी रात्री १० च्या सुमारास आरोपीने मला लाथाबुक्यांनी मारहाण करून उपाशी, एका वस्त्रानिशी घरातून काढून दिले व पैसे घेवून नाही आली तर नांदवणार नाही असे सांगितले' हे मी खोटे सांगत आहे.

१८. हे म्हणणे खरे आहे की, मी नांदण्याकरीता यावे म्हणून आरोपीने पनवेल येथील न्यायालयात केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीकडून घटस्पोट पाहीजे म्हणून मी त्याचे विरूध्द सदरची खोटी केस दाखल केली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.10.01 17:21:14 +0530

दिनांक ०१.१०.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले